महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.
www.dhepune.gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९, २६०५१७२९
Email: mavi.dhepune@gov.in

एनजीसी/२०२२/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/ १४५२८ दि.२७.१२.२०२२

27 DEC 2022

**(ई-मेलद्वारे तात्काळ)**

**प्रति,**

विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण)
मुंबई, पुणे, पनवेल,
औरंगाबाद, अमरावती, नांदेड, नागपूर.

**विषय -** अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे अद्यापही नॅक मूल्यांकन व मानांकन न झालेबाबत...

**संदर्भ -** १. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१०/(२०/१०)/विशि-३, दि ०८आक्टों.,२०१०.
२. संचालनालयाचे पत्र क्र. एनजीसी/२०१९/नॅक/सर्वविभाग/औवि/मवि-३/१३२२४,दि.२६.०९.२०१९ व समक्रमांक /सर्वअनु.म.वि.(११८)/जेडी/औवि/मवि-३,दि.०१.०४.२०१९.
३. संचालनालयाचे पत्र क्र.एनजीसी/२०१९/नॅक/सर्व अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/६४६९,दि.२५.५.२०२१.
४. संचालनालयाचे पत्रक्र.एनजीसी/२०१९/नॅकमूल्यांकन-बैठक(१०५)/औवि/मवि-३/१३४२८,दि.१६.११.२०२१
५. संचालनालयाचे पत्र क्र.एनजीसी/२०२१/नॅक/राज्यस्तरीय वेबिनार/औवि/मवि-३/१४०६९,दि.८.१२.२०२१.
६. संचालनालयाचे पत्र क्र.एनजीसी/२०२२/नॅक-(PAC)/औवि/मवि-३/३५७५,दि.०५.०४.२०२२.
७. संचालनालयाचे पत्र क्र.एनजीसी/२०२२/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/५२२६ दि.१७.०५.२०२२.
८. संचालनालयाचे पत्र क्र.एनजीसी/२०२२/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/१०१०१ दि.२७.०७.२०२२.
९. संचालनालयाचे पत्र क्र.एनजीसी/२०२२/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/१२२०२ दि.०३.१०.२०२२.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय क्र.१ येथील शासन निर्णय व संचालनालयाचे संदर्भिय पत्र क्र. २ ते ६ च्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांनी अकृषि विद्यापीठे व संलग्ति महाविद्यालये यांना नॅक मूल्यांकन करुन घेण्याबाबत वेळोवेळी शासन निर्णय, शासन परिपत्रके, सुचनापत्र निर्गमित करण्यात आली आहेत. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात बहुसंख्य महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन / पुनर्मुल्यांकन प्रक्रीयेत सहभाग घेऊन नॅक कडून "नॅक मूल्यांकन दर्जा" प्राप्त करुन घेतला असून नॅकच्या विविध Cycles च्या (II, III,..... Cycle) कालावधीतही नॅक मूल्यांकन करुन घेतले आहे. NAAC मूल्यांकन हे महाविद्यालयाच्या गुणवत्तेचे मापदंड असून शैक्षणिक गुणवत्ता व दर्जा धारण करणेसाठी दर पाच वर्षात महाविद्यालयाचे मूल्यांकन व पुनर्मुल्यांकन करुन घेणे बंधनकारक आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने महाविद्यालये / विद्यापीठ स्तरावर अभ्यासक्रम, बहुविद्याशाखीय शिक्षण, कौशल्य आधारीत अभ्यासक्रम, परिक्षा मुल्यमापन, अध्ययन अध्यापन, स्वायत्तता इत्यादी बाबतीत अमूलाग्र बदल होऊ घातलेले आहेत. या दृष्टीकोनातून महाविद्यालयांनी नॅक मानांकन व मूल्यांकनाच्या प्रक्रियेतून आपली गुणवत्ता राखणे, गुणवत्ता वाढ करणे अपेक्षित आहे. विद्यापीठ अनुदान आयोग, नॅक बंगलोर, महाराष्ट्र शासन नॅक मानांकन व मूल्यांकनाबाबत आग्रही आहेत.

याबाबत संचालनालयाचे पत्र संदर्भ क्र. ७, ८ व ९ अन्वये वेळोवेळी मार्गदर्शक सुचनांद्वारे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार नॅक बंगलोर, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी निर्गमित निर्देश पाहता, **आपणांस पुढील ६ महिन्यांत नॅक मानांकन व मूल्यांकन प्रकिया पूर्ण करुन नॅकचा अपेक्षित दर्जा प्राप्त करुन घेणे बंधनकारक आहे.** अन्यथा, शासन नियमानुसार व प्रचलित धोरणानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल, याबाबत कळविण्यात आले आहे.

71.

सबब, उपरोक्त नमुद विषयी विभागनिहाय ७८ महाविद्यालयांची सोबत जोडलेल्या यादीनुसार आपल्या विभागातील संबंधित महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन व मानांकनाबाबतची सद्यास्थिती खालील तक्त्यात तात्काळ संचालनालयास mavi.dhepune@gov.in या ई-मेलवर माहिती देण्यात यावी.

**तक्ता**

| विभाग | महाविद्यालयाचे नाव | नॅक मूल्यांकन प्रक्रियेत सहभाग घेतला आहे/नाही. नसल्यास संक्षिप्त कारण नमूद करावे. | असल्यास प्रक्रियेची सद्यस्थिती जसे (LOI / IIQA Submission/ SSR submission / Peer Team Visit etc.) | मूल्यांकन झाले असल्यास<br>नॅक ग्रेड व CGPA | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

सोबत : - एकदाही नॅक मुल्यांकन / मानांकन न केलेल्या महाविद्यालयांची यादी. (दि.३० नोव्हेंबर अखेर)

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- माहितीस्तव सादर

१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मंत्रालय,मुंबई.
२. स्वीय सहाय्यक, मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मंत्रालय,मुंबई.

प्रत- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१. कुलसचिव, संबंधित अकृषि विद्यापीठे.